संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# देशाची आर्थिक सुरक्षाही तितकीच महत्त्वाची

केंद्रात आलेल्या नव्या सरकारने देशाच्या सुरक्षिततेला प्राधान्य देण्याचे ठरवले आहे, किंबहुना सुरक्षिततेचा हाच मुद्दा घेऊन लोकसभेच्या निवडणुकाही लढवल्या गेल्या. निवडणुकीपूर्वी पुलवामा हल्ला प्रकरण झाल्याने लोकांना ती सुरक्षितता महत्त्वाची वाटत होती. परंतु या बाह्यसुरक्षिततेशिवाय देशाची अंतर्गत सुरक्षितता आणि त्याहीपेक्षा देशाची आर्थिक सुरक्षितता तितकीच महत्त्वपूर्ण ठरते. रिझर्व्ह बँकेने गेल्या आठ महिन्यात सलग तिसऱ्यांदा केलेली रेपो दरातली कपात ही गोष्ट देशाच्या आर्थिक सुरक्षिततेकडे लक्ष वेधणारी म्हणावी लागते. काही दिवसापूर्वीच सांख्यिकी आयोगाने बेरोजगारीचे आक्राळविक्राळ स्वरुप कसे आहे याची आकडेवारी जाहीर केली. तर आता त्यानंतर केंद्र सरकारने आर्थिक विषयात धोरणात्मक निर्णय घेणाऱ्या नीतीआयोगाची पुनर्रचना करण्याचा निर्णय घेतला. विशेष म्हणजे रेपो दरात कपात झाल्याबरोबर अनपेक्षितपणे शेअरबाजार गडगडला. यापूर्वीच्या रेपो कपातीच्यावेळी शेअर बाजार असाच घसरला होता. केंद्रसरकारच्या स्तरावर गेल्या काही दिवसातल्या आर्थिक क्षेत्राशी संबंधित काही घटनांचा आढावा घेतला तर देशाची आर्थिक सुरक्षितता किती महत्त्वपूर्ण आहे याच्यावर शिक्कामोर्तब होते. खरे तर रेपो दरातल्या कपातीनंतर शेअर बाजाराने उसळी मारायला हवी होती. तो गडगडण्याचे काहीच कारण नव्हते. परंतु हा प्रकार अनपेक्षितपणे घडला असल्याने देशापुढचे काही आर्थिक प्रश्न गांभीर्याने समोर ठाकले आहेत हे स्पष्ट होते. कदाचित या सर्व गोष्टींची जाणीव केंद्र सरकारला झाली असावी म्हणूनच नीतीआयोगाची पुनर्रचना करण्यापासून ते वेगवेगळ्या प्रश्नावर एका विशेष समितीची स्थापना करण्यापर्यंत सरकारला काही निर्णय घ्यावे लागलेले दिसतात. ही गोष्ट खरीच आहे की सध्या देशात आर्थिक मंदीचे वातावरण आहे. औद्योगिक उत्पादनाचा दर खाली आला आहे. सकल राष्ट्रीय उत्पन्न म्हणजेच जीडीपी याचा टक्कादेखील खाली आलेला दिसून येतो. ज्यावेळी सरकार एकूणच देशाच्या सुरक्षिततेविषयी काही मतप्रदर्शन करते त्यावेळी औद्योगिक उत्पादन , रोजगार, महागाई या संदर्भातली आर्थिक सुरक्षितता जपली गेली पाहिजे. याकडेदेखील दिशानिर्देश होतो.

### प्राधान्यक्रम ठरवा

नोटाबंदीनंतर देशाच्या आर्थिक क्षेत्रात बऱ्याच मोठ्या घडामोडी घडल्या. औद्योगिक उत्पादन खाली आल्याचे स्पष्ट तर झालेच.त्याशिवाय बेरोजगारीने वेगळेच स्वरुप धारण केले. हा सगळा घटनाक्रम अर्थकारणातल्या संभाव्य आव्हानांचे संकेत देणारा होता. केवळ लोकसभा निवडणुकीच्या धामधुमीमध्ये त्याबाबत निर्णय घेता येत नव्हते. खरे तर सत्ताधाऱ्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले होते. आता निवडणूक संपल्याबरोबर देशाच्या आर्थिक सुरक्षिततेने सर्वांचेच लक्ष वेधलेले आहे. निवडणुकांचे निकाल लागल्यानंतर प्रचंड उत्साहात उसळी मारणारा शेअर बाजार रिझर्व्ह बँकेच्या रेपो दराच्या घोषणेत इतका खाली आपटण्याची कारणेदेखील तशाच स्वरूपाची आहेत. राजकीय उत्साह हा वेगळा भाग ठरतो. आणि ज्या पैशाचे किंवा आर्थिक परिस्थितीचे सोंग आणता येत नाही. ज्या अर्थकारणातल्या बदलांचा वेध हा दुसरा भाग ठरतो. याचा अर्थ राजकारणाच्या धबडग्यामध्ये मूलभूत अशा आर्थिक प्रश्नांकडे दुर्लक्ष झाले. रेपो दरातील कपात हा रिझर्व्ह बँकेच्या एकूण कार्यक्षेत्राचा भाग जरी असला तरीदेखील ही कपात किती टक्क्यांनी करावी आणि त्याचे परिणाम काय असू शकतील या गोष्टीचा विचार रिझर्व्ह बँकेला करावा लागतो. देशाची मध्यवर्ती संस्था म्हणून पतधोरण जाहीर करणे हे जरी खरे असले तरीसुध्दा त्या पतधोरणातून देशाची पत टिकून राहील म्हणजेच आर्थिक सुरक्षितता कायम राहील याकडे लक्ष देणे तितकेच गरजेचे ठरते. रिझर्व्ह बँकेने या नव्या पतधोरणातून सरकारचे लक्ष वेधले आहे असे म्हटले तरी ते चुकीचे ठरणार नाही. जुलै महिन्यात नवे सरकार आपला अंतरिम अर्थसंकल्प जाहीर करेल. अर्थसंकल्पात पुन्हा एकदा लोकप्रिय घोषणा होण्याची शक्यता आहे.त्यातूनही रिझर्व्ह बँकेच्या काही निर्णयांना धक्का बसू शकतो. ती शक्यता लक्षात घेऊन रिझर्व्ह बँकेने ती पूर्वतयारी केली असावी. या सर्व घडामोडींचा एकत्रित सारांश काढला तर आर्थिक सुरक्षिततेकडे अधिक प्राधान्याने लक्ष देण्याची वेळ आलेली आहे. हे स्पष्ट होते.

### पुरेसे उत्पन्न हवे

देशाची सुरक्षितता या मुद्याचा विचार करताना केवळ बाह्य सुरक्षितता किंवा पाकिस्तान चीनबरोबरचे संबंध एवढ्यापुरताच विचार करून चालणार नाही. तर देशातील प्रत्येक नागरिकाला रोजगाराची शाश्वती राहिली पाहिजे. महागाईपासून त्याची मुक्तता झाली पाहिजे. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे आर्थिक विकास साधायचा असेल तर दरडोई उत्पन्नातही वाढ झाली पाहिजे. राजकीय स्वार्थासाठी पाकिस्तानबरोबरचे वैमनस्य पुढे करून सुरक्षिततेच्या मुद्याचा प्रचार करता येणे ही गोष्ट वेगळी आणि सामान्य माणसाच्या हिताची सुरक्षितता अधिक मूलगामी ठरते. पुलवामा किंवा त्यानंतरचा एअरस्ट्राईक या सगळ्या गोष्टींचे महत्त्व मान्य करीत असताना सरकारने लोकांच्या इतर सुरक्षिततेकडे तितक्याच प्राधान्याने लक्ष देण्याची वेळ आलेली आहे. म्हणूनच सुरक्षा या शब्दाची व्याप्ती खूप मोठी आहे. त्याचे वेगवेगळे संदर्भ लक्षात घेऊन सरकारने कार्य करण्याची आवश्यकता आहे. वैर पाकिस्तानशी पण देशातला सामान्य माणूस उपाशी असा हा परस्पर विरोध असता कामा नये. केवळ सतत घोषणा केल्यामुळेसुध्दा सुरक्षिततेचा हेतू साध्य होत नाही. यापूर्वी योजना आयोग असे नाव असलेल्या संस्थेचे नाव बदलून त्याचे नीती आयोग असे नाव केले गेले. परंतु नाव बदलल्यामुळे कार्यक्षेत्रात मूलगामी फरक पडला असे काही घडलेले नाही. कदाचित यासाठीसुध्दा आता सरकारने नीतीआयोगाची पुनर्रचना करण्याचा प्रयोग सुरु केला असावा. अन्न, वस्त्र, निवारा या गरजांची पूर्तता म्हणजेच आर्थिक सुरक्षा असे म्हटले तरी ते चुकीचे ठरणार नाही कारण या तीनही गरजा पूर्ण करण्याकरीता प्रत्येक व्यक्ती सक्षम किंवा भक्कम असावी लागते. म्हणजेच त्याचे उत्पन्न तितक्या प्रमाणात त्याला उपलब्ध व्हायला हवे.